**ठळक बातम्या**

- तमिळनाडू, पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीसाठी मतदान सुरू, बारामती आणि राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठीही आज मतदान

- सीबीएसईची इयत्ता दहावीची गुण सुधारण्यासाठीची परीक्षा १५ मे पासून

- उत्तरप्रदेशात रस्ते अपघातात ११ जणांचा मृत्यू

**आणि**

- अमेरिका आणि इस्राइलनं शस्त्रसंधीचं उल्लंघन केल्यामुळं होर्मुझची सामुद्रधुनी बंद ठेवण्याची इराणची घोषणा

**<><><><><>**

तामिळनाडू, पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीसाठी आज मतदान सुरू आहे. तमिळनाडूतल्या सर्व २३४ मतदारसंघात आज मतदान होतंय. यासाठी ४ हजार २३ उमेदवार रिंगणात असून ७५ हजारांहून अधिक मतदान केंद्र आहेत. सकाळी ११ वाजेपर्यंत तमिळनाडूमध्ये साडे ३७ टक्के मतदान झालं होतं.

पश्चिम बंगाल विधानसभेच्या पहिल्या टप्प्यातल्या १५२ जागांवरही आज मतदान सुरू आहे. या टप्प्यात १ हजार ४७८ उमेदवार आहेत. यासाठी निमलष्करी दलांच्या २ हजार ४०० हून अधिक तुकड्या तैनात आहेत. पश्चिम बंगालमध्ये ११ वाजेपर्यंत सुमारे ४१ टक्के मतदान झालं होतं. पश्चिम बंगालमध्ये मतदानादरम्यान काही ठिकाणी हिंसाचाराचे प्रकार समोर आले आहे. याप्रकरणी निवडणूक आयोगानं अहवाल मागवला आहे.

बारामती आणि राहुरी विधानसभा पोटनिवडणुसाठीही आज मतदान होतंय. राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, खासदार सुप्रिया सुळे आणि पार्थ पवार, आमदार रोहित पवार यांनी बारामतीत मतदान केलं. राहुरीत

उमेदवार अक्षय कर्डिले यांनी मतदानाचा हक्क बजावला. ११ वाजेपर्यंत बारामतीमध्ये २० टक्क्यांहून अधिक आणि राहुरीत १८ टक्क्यांहून अधिक मतदान झालं होतं.

गुजरातमधल्या आणंद जिल्ह्यातल्या उमरेठ विधानसभा पोटनिवडणुकीसाठीही आज मतदान होतंय.

पश्चिम बंगाल मधल्या उर्वरित मतदार संघात येत्या 29 एप्रिल ला मतदान होणार असून पश्चिम बंगाल, आसाम, तमिळनाडू, केरळ आणि पुद्दुचेरी विधानसभा निवडणुकीची मतमोजणी ४ मे रोजी जाहीर होईल.

**<><><><><>**

निवडणुकीच्या नंतर पेट्रोल आणि डिझेलच्या दरात वाढ होणार असल्याच्या चर्चांचं केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने खंडन केलं आहे. समाज माध्यमांवरच्या या बातम्या खोडसाळ आणि दिशाभूल करणाऱ्या असल्याचं मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

सीबीएसई अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता दहावीच्या परीक्षेच्या गुण सुधारणेसाठीच्या परीक्षेला १५ मे पासून सुरूवात होणार आहे. विज्ञान, गणित, सामाजिक विज्ञान आणि भाषा विषयात कामगिरी सुधारायची असेल तर उत्तीर्ण विद्यार्थ्यांना ही परीक्षा देता येणार आहेत. १५ एप्रिलला इयत्ता दहावीच्या नियमित परीक्षेचा निकाल जाहीर  झाला.

**<><><><><>**

उत्तरप्रदेशातल्या मिर्झापूर इथं काल रात्री झालेल्या रस्ते अपघातात अकरा जणांचा मृत्यू झाला. यात चार बालकांचा समावेश आहे. ट्रकचे ब्रेक फेल झाल्यामुळे चालकाने नियंत्रण गमावल्यामुळे ट्रक दोन कारवर जाऊन धडकून हा अपघात

झाला. यात कारमधले सात जण जागेवरच मृत्युमुखी पडले, तसंच दोन्ही कारचे चालक आणि ट्रक चालकाचाही यात मृत्यू झाला. पोलीस या घटनेचा तपास करत असून यातल्या मृतांची ओळख पटवण्याचा प्रयत्न करत आहेत.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उप राष्ट्रपती सी पी राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या घटनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. तसंच जखमी लवकर बरे व्हावेत अशी प्रार्थना केली आहे. मृतांच्या कुटुंबांना राष्ट्रीय मदत निधीमधून प्रत्येकी दोन लाख रुपये देण्याची घोषणा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केली आहे. तसंच जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांची मदत दिली जाईल.

**<><><><><>**

मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणाच्या तपासावरून मुंबई उच्च न्यायालयानं काल राष्ट्रीय तपास यंत्रणा आणि विशेष न्यायालयावर कडक ताशेरे ओढले. आधीच्या तपास यंत्रणांनी गोळा केलेल्या पुराव्यांकडे राष्ट्रीय तपास यंत्रणेनं पूर्णपणे दुर्लक्ष केल्याची टीका मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती श्याम चांडक यांनी केली. या प्रकरणातल्या चार आरोपींविरुद्ध पुरेसे पुरावे नसल्याचं सांगत मुंबई उच्च न्यायालयानं काल त्यांना दोषमुक्त केलं. त्यांच्याविरोधातले सर्व पुरावे हे परिस्थितीजन्य असल्याचं निरीक्षण न्यायालयानं नोंदवलं. या चौघांचा बॉम्बस्फोटात सहभाग असल्याचं सांगणारा एकही प्रत्यक्षदर्शी समोर आलेला नाही, यावर न्यायालयानं भर दिला. त्यांच्याविरोधात आरोपपत्र दाखल करायच्या विशेष न्यायालयाच्या निर्णयावरही न्यायालयानं परखड टीका केली. हे प्रकरण कुठल्याही निष्कर्षापर्यंत पोहोचलेलं नाही. राष्ट्रीय तपास यंत्रणा आणि दहशतवादविरोधी पथकानं दाखल केलेली दोषारोपपत्रं परस्परविरोधी असून यामुळे तपासाची दिशा स्पष्ट होणं अशक्य आहे, असं न्यायालयानं आदेशात म्हटलं आहे. ८ सप्टेंबर २००६ रोजी झालेल्या या स्फोटात ३१ जण ठार झाले होते. भाजपाच्या माजी

खासदार प्रज्ञा सिंह ठाकुर यांच्यासह ६ इतर आरोपींना गेल्या वर्षी जुलै महिन्यात विशेष न्यायालयानं पुराव्याअभावी सोडून दिलं होतं.

<><><><><>

उत्तराखंडमधल्या चमोली जिल्ह्यातल्या बद्रीनाथ मंदिराचे दरवाजे आज सकाळी वैदिक मंत्रोच्चार आणि पांरपरिक विधींच्या गजरात भक्तांसाठी उघडण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी राष्ट्राच्या आणि राज्याच्या कल्याणासाठी प्रार्थना केली. तसंच यात्रेच्या सुरक्षा व्यवस्थेचाही आढावा घेतला.

<><><><><>

अमेरिका आणि इस्रायलने शस्त्रसंधीचं उल्लंघन केल्यामुळे होर्मुजची सामुद्रधुनी उघडता येणार नाही असं इराणने म्हटलं आहे. अमेरिकेने इराणच्या बंदरांवर नाकेबंदी केली आहे, यामुळे जागतिक अर्थव्यवस्था वेठीस धरली जात आहे तसंच इस्रायलही युद्धखोरी करत आहे, असं इराणच्या संसदेचे सभापती मोहम्मद बागेर गालीबाफ यांनी समाजमाध्यमावरल्या संदेशात म्हटलं आहे. इराण चर्चेला तयार आहे, मात्र अमेरिकेने केलेली नाकेबंदी, आश्वासनांचं उल्लंघन आणि धमक्या यामुळे चर्चेत अडथळा येत आहे, असं इराणचे राष्ट्राध्यक्ष मसुद पेझेश्कियान म्हणाले.

<><><><><>

इराणची हवाई हद्द अंशतः खुली झाल्यामुळे इराणधल्या अमेरिकन नागरिकांनी परत यावं, असं आवाहन अमेरिकेने केलं आहे. इराणच्या शेजारच्या देशांमधून विमानमार्गे किंवा रस्ते मार्गाने इराणच्या बाहेर पडायची सूचना करण्यात आली आहे. इराणचा अमेरिका आणि इस्रायलविरुद्ध संघर्ष सुरू झाल्यानंतर

इराणने आपली हवाई हद्द बंद केली होती, आता ती टप्प्याटप्प्याने खुली केली जात आहे.

<><><><><>

भारताच्या परराष्ट्र धोरणात आफ्रिका केंद्रस्थानी असून हे संबंध समानता, परस्पर आदर आणि प्रगतीवर अवलंबून आहेत असं परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनी म्हटलं  आहे. आगामी चौथ्या भारत - आफ्रिका फोरम समिटच्या पार्श्वभूमीवर नवी दिल्लीत लोगो, थीम आणि संकेतस्थळ अनावरण प्रसंगी ते आज बोलत होते. भारत आणि आफ्रिकेच्या भागीदारीत एक नवा अध्याय लिहिण्यासाठी आपण आज जमलो आहोत, आजच्या जागतिक अस्थिरतेच्या काळात हे संबंध अतिशय महत्त्वाचे आहेत,  असं जयशंकर यावेळी म्हणाले.

<><><><><>

ईशान्य नायजेरियातल्या बोर्नो राज्यामध्ये सांबिसा जंगलाच्या सीमेवर असलेल्या पुबागु गावावर अतिरेक्यांनी केलेल्या हल्ल्यात ११ जण ठार झाले असून दोन जण गंभीर जखमी झाले आहेत.

<><><><><>

पंजाबमध्ये लुधियाना इथल्या एका उद्योगपतीची बनावट ट्रेडिंग वेबसाईटच्या माध्यमातून २० कोटी रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. सायबर चोरांनी शेअर मार्केटमध्ये व्यवहारासाठी उपयुक्त अशा एका विश्वासार्ह ट्रेडिंग प्लॅटफॉर्मची बनावट वेबसाईट तयार केली. खोटा डिजिटल डॅशबोर्ड आणि बनावट सिम कार्डांचा वापर करून हा घोटाळा करण्यात आला आहे. पंजाब पोलिसांच्या सायबर गुन्हे विभागाने या प्रकरणी गुन्हा दाखल केला असून चौकशी सुरू केली आहे.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आजचा सामना मुंबई इंडियन्स विरुद्ध चेन्नई सुपर किंग्स यांच्यात होणार आहे. हा सामना मुंबईत वानखेडे स्टेडियमवर संध्याकाळी साडेसात वाजता सुरू होईल.

काल झालेल्या सामन्यात राजस्थान रॉयल्सने लखनौ सुपर जायंट्सवर ४० धावांनी विजय मिळवला. लखनौ संघाने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला होता. राजस्थान रॉयल्सने निर्धारित २० षटकांत ६ बाद १५९ धावा केल्या. या धावांचा पाठलाग करताना लखनौचा संघ अवघ्या १८ षटकांत सर्व गडी गमावून ११९ धावाच करू शकला.

**<><><><><>**

दक्षिण आफ्रिकेच्या संघानं काल टी ट्वेंटी सामन्यात भारतीय महिला क्रिकेट संघाला ९ गड्यांनी पराभूत केलं. जोहान्सबर्गमध्ये झालेल्या या सामन्यात भारतीय संघानं ४ बाद १९२ धावा केल्या होत्या. दक्षिण आफ्रिकेनं केवळ १ गडी गमावून १९३ धावांचं लक्ष्य साध्य केलं. पाच सामन्यांच्या या मालिकेत आतापर्यंतचे तिन्ही सामने भारतानं गमावले आहेत.

**//<><><><><>//**